


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २३७ वा शुक्रवार दि १४ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये




# डोंगरखंडाळा जमीन घोटाळा! १४ एकर शेती प्रकरणात राजकीय हस्तक्षेप?

## दै.जनसंचलन करणार मोठं उघड! १४ एकर शेती प्रकरणात कोणामागे कोण? रहस्य लवकरच उलगडणार!

**जनसंचलन/बुलढाणा**

पुण्यातील अमोडिया कंपनीच्या १८०० कोटींच्या जमीन व्यवहारासारखाच एक धक्कादायक घोटाळा आता बुलढाण्यात उघडकीस येत आहे! बुलढाणा तालुक्यातील डोंगरखंडाळा गावातील तारे परिवाराच्या सामूहिक २८ एकर शेतीपैकी तब्बल १४ एकर जमीन नियमबाह्य पद्धतीने छत्रपती संभाजीनगर येथील कंत्राटदार महेंद्र राऊत यांच्या नावावर खरेदी झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.तारे परिवाराने घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही जमीन अजून हिस्सेवाटणी न झालेली असताना तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या संगनमताने खोटे कागद तयार करून जमीन बेकायदेशीररित्या विकली गेली, असा स्फोटक आरोप करण्यात आला. या घोटाळ्यामागे स्थानिक राजकीय दबाव आणि आर्थिक व्यवहारांचा मोठा खेळ असल्याची चर्चा बुलढाण्यात चांगलीच रंगली आहे. तारे परिवाराने प्रशासनाकडे न्यायाची मागणी करत या प्रकरणाची सखोल चौकशी व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे, या प्रकरणात संबंधित अधिकारी गप्प बसले आहेत, तर राऊत यांच्याकडूनही कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. या १४ एकर शेतीच्या व्यवहारामागे नक्की कोण? कोणाच्या दबावाखाली झाला हा सौदा? दैनिक जनसंचलन लवकरच उघड करणार या संपूर्ण प्रकरणाचं गुंतागुंतीचं रहस्य!

## काँग्रेस नेत्याचा रेल्वेतून पडून मृत्यू चिखलीत शोककळा!

**जनसंचलन/बुलढाणा**

चिखली तालुक्यातील काँग्रेस पक्षाला हादरा देणारी धक्कादायक घटना घडली आहे. काँग्रेसचे माजी तालुका अध्यक्ष आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सत्येंद्र भुसारी (वय ५५) यांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला आहे. मुंबईहून चिखलीकडे परतताना कसारा घाटात चालत्या रेल्वेतून पडल्याने ते गंभीर जखमी झाले. तत्काळ नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भुसारी हे चिखली तालुक्यातील भोरसा भोरसी येथील रहिवासी असून सध्या गांधी नगर चिखली येथे वास्तव्यास होते. त्यांच्या अकस्मात निधनाने काँग्रेसमध्ये हळहळ व्यक्त केली जात असून चिखली शहरात शोककळा



पसरली आहे. दीर्घकाळ पक्षनिष्ठ कार्यकर्ता म्हणून त्यांनी स्थानिक राजकारणात आपली छाप पाडली होती. त्यांच्या निधनामुळे चिखली तालुक्यातील काँग्रेसला मोठी पोकळी निर्माण झाली असून अनेक कार्यकर्त्यांनी सामाजिक माध्यमांवर श्रद्धांजली वाहिली आहे. सत्येंद्र भुसारी यांचा स्नेह, कार्यनिष्ठा आणि साधेपणा यांची आठवण कायम राहील.

## तरुणीला मोबाइल नंबर मागणे पडले महागात, एकास शिक्षा!

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातील आठवडी बाजारात मोबाइल नंबर मागून तो देण्यास नकार देणाऱ्या तरुणीला मारहाण करत शिवीगाळ करणाऱ्या शेख रशीद शेख रफिक (रा. जोहरनगर) याला बुलढाणा येथील मुख्य न्यायदंडाधिकारी अमित खंडाळे यांनी दोषी ठरत दंडासह कोर्ट उठेपर्यंत कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ही घटना १२ मार्च २०१८ रोजी नगरपरिषद कार्यालयाजवळ घडली. आरोपी आठवडी बाजारात केळीची गाडी लावत असताना त्याने शेजारी भाजी विकणाऱ्या महिलेच्या मुलीचा मोबाइल क्रमांक मागितला. मुलीने नकार दिल्यावर आरोपीने अश्लील शिवीगाळ करत तिच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने फिर्यादीने हस्तक्षेप केला, त्याच क्षणी आरोपीने तिच्या डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केले. शिवीगाळ आणि जीवे मारण्याच्या धमकीची नोंदही तक्रारीत आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीविरुद्ध धोकादायक साधनाने दखापत करणे. अश्लील शब्द वापरल्या बुलढाणा न्यायालयाचा निकाल, २०१८ मध्ये घढली होती आठवडी बाजारात घटना प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. न्यायालयात सरकार पक्षाने चार साक्षीदार उभे केले. त्यात तक्रारकर्ती महिला, जखमी मुलगी, प्रत्यक्षदर्शी आणि तपास अधिकारी यांचा समावेश होता. सर्व साक्षी आणि वैद्यकीय पुरावे आरोपीविरुद्ध भक्कम स्वरूपाचे असल्याचे न्यायालयाने निरीक्षणात नमूद केले. प्रकरणी मुख्य न्यायदंडाधिकारी खंडाळे यांनी आरोपीला तीन हजार रुपये दंड व कोर्ट उठेपर्यंत कारावास तसेच दंड न भरल्यास १० दिवस साधा कारावास यासह अन्य कलमान्वये शिक्षा सुनावणीली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल संजय डोंगरदिवे




यांनी पूर्ण केला. खटल्यातील कामकाज कोर्ट पैरवी तथा पोलिस हेडकॉन्स्टेबल गजानन मांटे यांनी पाहिले. सरकारी वकील हितेश रहाटे यांनी प्रभावी आणि तथ्याधारित युक्तिवाद करत आरोपीचा दोष सिद्ध केला. तरुणीविरोधातील छेडछाडीचे प्रकार आणि सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांविषयी गैरवर्तनाला न्यायालयाने कठोर संदेश देत सुनावलेला हा निकाल विशेष महत्त्वाचा ठरत आहे.

# चाचण्यांचं बोकाळलेलं खूळ

## संपादकीय लेख

हल्ली ङ्ग मचं म्हणजे सर्वांगीण शारीरिक तपासणीचं खूळ बोकाळलं आहे. जशी काय बॉडी नाही, गाडीच आहे! वर्षभरात एक-दोन वेळा गॅरेजला पाठवून दिली की बघायला नको!! अकाली, अकस्मात मृत्यूंच्या वाढत्या बातम्यांमुळे वैयक्तिक आरोग्याच्या चिंतेचं प्रमाण खूप वाढलं आहे, यात शंका नाही. अधिकाधिक दडपणाखालील जीवनशैली देखील याला जबाबदार आहे. परंतु दिवसेंदिवस खर्च करायला उपलब्ध असलेल्या जादा पैशांत होत असलेली वाढ या मानसिकतेला मुख्यतः जोपासत आहे. नेमक्या याच गोष्टींचा फायदा घेऊन हल्ली ङ्ग म या नावाखाली एक प्रचंड मोठा घोटाळा चालवला जात असून, हजारो-लाखो सुशिक्षित लोक त्याला बळी पडत आहेत. ९९९ रुपयांत ९९, १४९९ रुपयांत १००, ३००० रुपयांत २५१ चाचण्या... असल्या मार्केटिंगच्या अत्यंत आकर्षक युक्त्या, तुमच्या घरी, तुमच्या वेळेत येऊन चाचणीसाठी रक्त घेण्याची सेवा या सर्वांची भुरळ न पडली तरच नवल. एवढ्याशा पैशांत इतक्या तपासण्या घरबसल्या होऊन जातील, हा मोह पडतोच. यापासून कॉर्पोरेट क्षेत्रातील रुग्णालये आणि लॅबोरेटरीज् मुक्त तर नाहीतच, उलट चार पावलं पुढेच आहेत. त्यांच्याकडील तो विशेष वातानुकूलित विभाग, अदबीनं इंग्रजीतून बोलणारा तरुण कर्मचारीवर्ग, चहा-बिस्कीटांची सेवा, बिस्लरीच्या बाटल्या... या सगळ्यांनी आपली खात्रीच होते की, किती माझ्या तब्येतीची काळजी घेतली जातेय! मानवी शरीर हे एक अत्यंत किचकट रचना असलेलं यंत्र आहे. आज एकविसाव्या शतकापर्यंत तरी, मानवाला याहून क्लिष्ट आणि तरीपण दमदार, टिकाऊ आणि सक्षम अशा यंत्राची निर्मिती करता आलेली नाही. यात क्वचित प्रसंगी होणाऱ्या एखाद्या बिघाडानं चकित न होता, इतक्या गुंतागुंतीचं हे यंत्र किती कमी वेळा बिघडतं या गोष्टीचा अचंबा करायला हवा. एखादं गणित मांडून किंवा समीकरणानं त्याच्या सुदृढतेचा किंवा बिघाडाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करणं निव्वळ हास्यास्पद आहे.

आपण प्रत्येकानं कधी ना कधी लॅब रिपोर्ट पाहिलेला आहे. एक लक्षात घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ङ्गनॉर्मलफ या स्तंभात कधीच कुठल्याही तपासणीला एक ठराविक आकडा नसतो, तर ङ्गरेंजफ असते. भूमितीतील पाय् () किंवा भौतिकशास्त्रातील प्रकाशाच्या वेगाला रेंज नाही. तो एक अ-परिवर्तनीय आकडा असतो. पण रक्तदाब, रक्तशर्करा यांसाठी ङ्गरेंजफ आहे. भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र यांतील हा मूलभूत फरक आहे. याला शरीराची अत्यंत गुंतागुंतीची रचना हे कारण तर आहेच; शिवाय अनुवांशिकता, वय, शरीरयष्टी आणि प्रकृतीधर्म यांपासून ते दिवसातील कोणत्या वेळी चाचणी झाली इथपर्यंत कित्येक विभिन्न गोष्टींचा परिणाम कोणत्याही चाचणीच्या निष्कर्षांवर होऊ शकतो. ङ्गजर विविध वयोगटांतील, कोणतीही शारीरिक तक्रार नसलेल्या १०० लोकांच्या रक्ताच्या १० वेगवेगळ्या चाचण्या केल्या, तर प्रत्येक चाचणीचे किमान १० टक्के निकाल अ-सामान्य (अबनॉर्मल) येतीलफ, असं आमचे एक शिक्षक म्हणत असत. माझ्या चाळीसहून अधिक वर्षांच्या प्रॅक्टिसमध्ये मी देखील हेच अनुभवलं आहे. कम्प्युटरच्या साह्याने काढलेल्या निष्कर्षांमध्ये बारकाव्यांना जागा नसते. पुस्तकात दिलेल्या ङ्गनॉर्मल रेंजफच्या एक सहस्त्रांशाने जरी एखादा घटक बाहेर-अधिक असेल तरी तो निष्कर्ष लाल, ठळक अक्षरांत आपल्या हातात पडतो. त्या चाचण्या करणाऱ्या यंत्रांचं किंवा निष्कर्ष छापणाऱ्या प्रिंटरचं प्रोग्रामिंगच तसं केलेलं असतं. असला एखादा अ-सामान्य निष्कर्ष आपली झोप उडवून जातो. मग त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांचं निरसन करण्यासाठी आणखी चाचण्या केल्या जातात. बऱ्याच वेळा त्यात देखील असाच एखादा अ-सामान्य निष्कर्ष येतो आणि म्हणून मग आणखी चाचण्या... या दुष्टचक्राचे किती फेरे होतील, हे सांगणं कठीण आहे. या असल्या चाचण्यांचं-तपासणीचं हे सर्वांत मोठं वैगुण्य.उपरोक्त विवेचन फक्त रक्ताच्या तपासण्यांचं केलं असलं, तरी थोड्या-फार फरकानं एक्सरे, सोनोग्राफी, ईसीजी या सर्वांना देखील ते लागू पडतं. देवनिर्मित आणि जैविक ( - ) असलं तरी शेवटी शरीर हे एक यंत्र आहे, ही गोष्ट लक्षात ठेवून विचार केला तर असं ध्यानात येईल की, वापराबरोबर (म्हणजेच वयाबरोबर) त्याची आणि त्याच्या प्रत्येक भागाची आणि संस्थेची झीज होणं अटळ आहे. याचा थेट परिणाम म्हणून, वयाबरोबर अनेक चाचण्यांत मिळणारे निष्कर्षांचे आकडे बदलत असतात. बहुधा ही सामान्य गोष्ट असते. परंतु लाल रंगात ठळक अक्षर-आकड्यांत दिलेला निष्कर्ष तुमचं नेहमीचं व्यवहारी शहाणपण तुम्हाला विसरायला लावतो! माझ्या मते, या असल्या चाचण्यांमध्ये सर्व निष्कर्ष ङ्गनॉर्मलफ येणं, यांत याहूनही मोठा धोका आहे; कारण आपण एका फसव्या सुरक्षितपणाच्या उबेत सुखावतो! विविध कारणांमुळे समाजात मलेरिया, क्षयरोग, गॅस्ट्रो इत्यादी आजार आणि ते आजार जिवावर बेतण्याचे प्रसंग फार कमी झालेत; या उलट, उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग अशा जीवनशैलीशी निगडीत आजारांचं प्रमाण झपाट्यानं वाढत आहे. खाणं आणि झोप यांच्या अनियमित आणि अनारोग्यवर्धक सवयी, व्यायामाचा अभाव, विविध श्रेणींतील लठ्ठपणा, फास्ट फूड, मद्य आणि तंबाखूजन्य पदार्थांचं सेवन यासारख्या ज्या गोष्टी याला मुख्यत्वे जबाबदार आहेत त्या बदलणं खरं तर आपल्या हातात आहे. पण ङ्गफुल बॉडी चेकअपचा रिपोर्ट नॉर्मल आहेफ या धीरामुळे माणसाला दुसरी काहीही काळजी घेण्याची गरजच भासत नाही! हे किती धोकादायक आहे! स्वतःच्या मनानं किंवा जाहिराती, गुगल, मित्र, व्हॉट्सॲप असल्या बिनबुडाच्या ठिकाणांहून मार्गदर्शन घेऊन चाचण्या करण्यातही धोका आहे. वैद्यकीय चक्रव्यूहातून योग्य निदानापर्यंत पोचण्याचा मार्ग श्रीकृष्णाप्रमाणे फक्त तुमचा डॉक्टरच दाखवू शकतो... सामान्य ज्ञान नव्हे आणि गुगल तर नक्कीच नाही. वैद्यकीय अभ्यासक्रमात (मी येथे फक्त जे सामान्यपणे ङ्गॲलोपथीफ या नावानं ओळखलं जातं त्याविषयीच बोलत आहे.) पिढ्यानपिढ्या, समोर आलेल्या प्रत्येक रुग्णाला तपासून औषधोपचार करण्याचा एक निश्चित क्रम शिकवला जातो. आधी रुग्णाच्या तक्रारी ऐकून घेऊन, त्या अनुषंगाने काही प्रश्न विचारायचे, नंतर शारीरिक तपासणी आणि त्या नंतर आवश्यक वाटल्यास संबंधित असतील तेवढ्या नेमक्याच तपासण्या-चाचण्या. यातील आधीच्या प्रत्येक पायरीवरून पुढच्या पायरीची दिशा आणि पावलं ठरतात. अशा प्रकारे पूर्ण विचारांती करून घेतलेल्या तपासण्यांचे निष्कर्ष पाहून, त्याचा अर्थ लावून आजाराचं निदान सुनिश्चीत करण्यात चांगल्या डॉक्टरला अजिबात अडचण येणार नाही. परंतु केवळ उपलब्ध आहे म्हणून करून घेतलेल्या चाचण्यांतून आपल्याला जी हवी आहे किंवा मिळायला हवी ती माहिती कशी मिळेल? आमच्या क्षेत्रात एक सुविचार नेहमी सांगितला जातो... जे मनाला माहीत नाही, ते डोळ्यांना दिसत नाही. तुम्ही हजारो रुपये खर्च करून मिळविलेले निष्कर्ष समजण्याचं ज्ञान जर तुमच्यापाशी नसेल तर त्यांचा अर्थ तुम्ही कसा लावणार?




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एकनाथ खडसेंच्या बंगल्यात मध्यरात्री चोरटे घुसले; कॅश आणि सोन्याचे दागिनेही लंपास

**जळगाव :** सध्या दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने अनेक जण आपल्या कुटुंबासह बाहेर फिरायला जातात. ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हेदेखील दिवाळीनिमित्त बाहेरगावी असताना त्यांच्या जळगाव शहरातील शिवराम नगर भागातील घरी मध्यरात्री चोरट्यांनी चोरी करून ३५ हजार रुपये रोख आणि सात ते आठ तोळे सोने लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. खडसे यांच्या घरी झालेल्या चोरीच्या या घटनेमुळे जळगाव शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांचा जळगाव शहरात शिवराम नगर भागात बंगला आहे. या ठिकाणी ते वास्तव्यास असतात. मात्र दिवाळी सणानिमित्त ते कुटुंबासह बाहेर फिरायला गेलेले असताना त्यांच्या बंगल्याचा सुरक्षारक्षकही सणाच्या सुट्टीमुळे गावाला गेला होता. त्यामुळे घराला कुलूप होते. हीच संधी साधत चोरट्यांनी मध्यरात्री मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.चोरट्यांनी घरात असलेली रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने घेऊन पळ काढला.



सकाळी ही बाब आजूबाजूच्या रहिवाशांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ फोन करून घटनेसंदर्भात माहिती दिली. त्यानंतर तपासासाठी पोलीस खडसे यांच्या घरी दाखल झाले आणि स्थानिक गुन्हे शाखेची काही पथके चोरांच्या मागावर रवाना करण्यात आली असल्याची माहिती आहे.जळगाव शहरातील शिवम नगर भागात माझा बंगला आहे. दिवाळीनिमित्त वॉचमन त्याच्या गावी गेलेला आहे आणि त्या घराला सध्या कुलूप होते. मी देखील बाहेरगावी होतो. घरात माझ्या लॉकरमध्ये ३५ हजार रुपये रोख रक्कम होती. काही पाच-पाच ग्रॅमच्या दोन अंगठ्या होत्या आणि एकूण सात ते आठ तोळे सोने होते. ही रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने चोरी करण्यात आले आहेत,' अशी माहिती एकनाथ खडसेंनी दिली आहे.

दरम्यान, गेल्या महिन्यात केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या मुक्ताईनगर येथील पेट्रोल पंपावर रात्री ११ वाजेच्या सुमारात दरोडा टाकण्यात आला होता. तिथंही दरोडेखोरांनी सामानाची तोडफोड करून एक लाख रुपये मुद्दल लंपास केली होती. या घटनेला एक महिना होत नाही तोच आता एकनाथ खडसे यांच्या जळगाव शहरातील बंगल्यात मध्यरात्री चोरट्यांनी चोरी करून रोख रक्कम आणि सात ते आठ तोळे सोने लंपास केले आहे.

## वयाने मोठ्या युवतीवर प्रेम जडलं, साताऱ्यात विद्यार्थ्याने आयुष्य संपवलं

**सातारा :** अभ्यासाचा ताण आणि आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या युवतीवरील प्रेमाला विरोध होण्याच्या ताणातून एका १७ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी उघडकीस आली आहे. या मुलाने आपल्या ताणाची कबुली देणारी चिठ्ठी लिहून आत्महत्येपूर्वी ती वडिलांना व्हॉट्स ॲपवर पाठवली होती.

संबंधित मुलगा मूळचा सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आहे. साताऱ्याजवळ वसतिगृहात राहून तो शिक्षण घेत होता. शुक्रवारी तो दिवाळी सुट्टी संपवून परत वसतिगृहात आला. मात्र, त्याने दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री चिठ्ठी लिहून ती वडिलांच्या व्हॉटसॲपवर पाठवली. वडिलांनी ती दुसऱ्या दिवशी वाचली. त्या वेळी त्यांना धक्का बसला. कॉलेजवर फोन करून माहिती घेतली असता, त्यानंतर ही घटना समोर आली.मृत मुलाला बहीण असून, तिचे एका मुलावर प्रेम आहे. मात्र, कुटुंबीयांकडून मुलीच्या प्रेमाला विरोध आहे. अशातच या मुलाचेही त्याच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या युवतीवर प्रेम जडले होते. कुटुंबीयांकडून आपल्या प्रेमालाही बहिणीप्रमाणेच विरोध होईल, अशी भीती त्याला वाटत होती. त्याचबरोबर अभ्यासाचा ताण यातून मुलाने चिठ्ठी लिहून आत्महत्या केली असल्याचे पोलिसांनी सांगितले. सातारा तालुका पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह जिल्हा रुग्णालयात नेला. शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबीयांकडे सोपवण्यात आला. हवालदार किरण निकम तपास करीत आहेत.

## मित्राने लोणंदमध्ये २२ वर्षांच्या तरुणाला संपवलं

**सातारा :** खंडाळा तालुक्यातील लोणंदमध्ये २२ वर्षांच्या तरूणाची भिंतीवर डोके आपटून आणि पट्ट्याने गळा आवळून हत्या करण्यात आली आहे. ही घटना उघडकीस येताच लोणंदमध्ये खळबळ उडाली. या घटनेचा अवघ्या दोन तासात छडा लावण्यात लोणंद पोलिसांना यश आलं आहे. गणेश संतोष गायकवाड असं मृत तरूणाचे नाव आहे. तो पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील पिंपळसुटी गावचा रहिवासी आहे. तो सध्या लोणंद येथे वास्तव्यास होता. त्याच्या अल्पवयीन रूम पार्टनरनेच हत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे.लोणंद पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश गायकवाड हा लोणंद एमआयडीसी परिसरात कामाला आणि माळीआळी परिसरात वास्तव्यास होता. पोलिसांनी ताब्यात घेतलेला संशयित अल्पवयीन मुलगा लोणंद येथे शिक्षण घेत आहे. दोघांची मेसमध्ये ओळख झाली होती. त्यानंतर दोघे एकाच खोलीत भाड्याने राहत होते.अभ्यास आणि मोबाईल वापरावरून त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर गणेश झोपेत असताना रूम पार्टनरने रागाच्या भरात त्याचे डोके भिंतीवर आपटून कमरेच्या पट्ट्याने गळा आवळल्याने गणेशचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली. तरुणाच्या हत्येची माहिती मिळताच पोलिसांनी फॉरेन्सिक टीम,



फिंगरप्रिंट आणि डॉग स्क्वॉडला घटनास्थळी पाचारण करून पुरावे गोळा करण्यात आले. या घटनेची माहिती मृताच्या रूम पार्टनरने दिली असल्याने पोलिसांनी त्याची चौकशी सुरू केली. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटू लागल्याने पोलिसांनी कसून चौकशी केली. अखेर त्याच्याच कबुली जबाबातून हत्येचा उलगडा झाला. सहायक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले, उपनिरीक्षक रोहित हेगडे आणि गुन्हे प्रकटीकरण शाखेने हा तपास केला. तरुणाच्या हत्येप्रकरणी ताब्यात घेतलेल्या अल्पवयीन संशयिताला बाल न्यायालयात हजर केलं होतं. त्याची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. या घटनेच्या तपासासाठी उद्या पुन्हा त्याची चौकशी केली जाणार आहे.

# महिलांच्या खासगी क्षणांचे गुप्त चित्रीकरण करण्यासाठी रिसॉर्ट चालकाने स्वच्छतागृहात बसविला छुपा कॅमेरा..

**रायगड :** अनेकदा मॉलमधील महिलांच्या चेंजिंग रूममध्ये, कधी हॉटेल किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहात हिडन कॅमेरे आढळून असल्याच्या घटना समोर आल्या आहे. अशीच एक घटना पनवेल तालुक्यातील धानसर या गावात असणाऱ्या एका रिसॉर्टमधील स्वछतागृहात घडली असून या प्रकरणी एकास ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेने महिला व मुलींच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महत्वाचे म्हणजे ही पहिलीच घटना नाही. याआधी देखील असे अनेक प्रकार समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात असणाऱ्या धानसर गावात असणाऱ्या एका खासगी फार्म हाऊस येथे काही दिवस रोजच्या कामाच्या धकाधकीतून



काही दिवस काढून विश्रांतीसाठी कुटुंबासाहित महिला ही आली होती. सदर फार्म हाऊस हे मूळ मालकाने काही काळासाठी मनोज चौधरी (वय ३५, रा. रांजनपाडा, खारघर) याच्याकडे भाडे तत्वावर सोपविले होते. शनिवार, २५ ऑक्टोबर रोजी मुंब्रा येथील एक कुटुंब काही दिवस निसर्गाच्या सानिध्यात घालवण्यासाठी येथे आले होते.सर्व काही मौज मजेत सुरू असतानाच, रविवारी सकाळी त्या कुटुंबातील एका तरुणाला स्वच्छतागृहातील बल्बच्या होल्डरविषयी संशय आला. त्याने तपास केला असता होल्डरमध्ये लपवलेला एक छोटा कॅमेरा सापडला. कॅमेऱ्यातील फुटेज तपासून पाहिल्यावर महिलांच्या आंघोळीचे दृश्य रेकॉर्ड झाल्याचे उघड झाले. संतापलेल्या कुटुंबीयांनी त्वरित तळोजा पोलिसांकडे तक्रार दाखल केली.वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून आरोपीला अटक केली. तपासाची जबाबदारी पोलीस निरीक्षक सागर निकम यांच्याकडे देण्यात आली आहे. विश्रांतीसाठी फार्महाऊसवर आलेल्या महिलांच्या खासगी क्षणांचे गुप्त चित्रीकरण करण्यासाठी रिसॉर्टचालकाने स्वच्छतागृहात छुपा कॅमेरा बसविल्याचा प्रकार उघड झाला आहे.या प्रकरणात तळोजा पोलिसांनी मनोज चौधरी (वय ३५, रा. रांजनपाडा, खारघर) याला अटक केली आहे. असल्याची माहिती तळोजा पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणात गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला असून, आरोपीने महिलांच्या गोपनीयतेचा घोर भंग केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पोलिसांनी अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. परिसरातील महिलांनीही फार्महाऊस, रिसॉर्ट किंवा सार्वजनिक ठिकाणी वापरताना अधिक सजग राहण्याचे आवाहन तळोजा पोलिसांनी केले आहे.

# गर्लफ्रेंडचे चोचले पुरवण्यासाठी २० वर्षीय देवेशने केलं मोठं कांड

**नागपूर :** शिक्षण घेत असतानाच हॉटेल मॅनेजमेंटचा एक विद्यार्थी दुचाकी चोरीच्या मार्गावर गेला आणि अवघ्या काही महिन्यात ११ दुचाकींची चोरी करून पोलिसांच्या रडारवर आला. जुगार खेळण्याचं व्यसन आणि गर्लफ्रेंडचा खर्च भागवण्यासाठी चोरीच्या वाटेवर गेलेल्या या तरुणाला अखेर कळमना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी देवेश देवेंद्र सनोडिया (वय २०, रा. सुंदरनगर, पारडी) असं अटकेत असलेल्या तरुणाचं नाव आहे.



मार्च २०२५ पासून ऑक्टोबरपर्यंत कळमना परिसरातील कडकनाथ मार्केटमध्ये दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. व्यापारी, कामगार आणि ग्राहकांची वाहने बाजारपेठेतून वारंवार गायब होऊ लागल्याने नागरिक त्रस्त झाले होते. सततच्या तक्रारींनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी त्या ठिकाणचा सखोल अभ्यास केला. चोरी घडणाऱ्या ठिकाणांचा आलेख तयार करून त्या परिसरात पोलिसांनी स्वतःच्या खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले. अखेर याच फुटेजच्या आधारे आरोपीपर्यंत पोलीस पोहोचले.५ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी आरोपी देवेशला ताब्यात घेतलं असता त्याच्याकडे एक चोरीची दुचाकी सापडली. चौकशीत त्याने आणखी १० गाड्या चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून एकूण ११ दुचाकी आणि एक आयफोन असा सुमारे ३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पोलीस तपासात उघड झालं की, देवेश हा मार्केट परिसरात नियमित ये-जा करत असे.


त्याच्या वडिलांचे कळमना मार्केटमध्ये भाजीपाला विक्रीचं दुकान असल्याने तो सहज त्या परिसरात फिरत असे, लोक खरेदीत व्यस्त असताना तो त्याचा गाडीची चावी ज्या गाडीला लागू शकते ती गाडी तो चोरून न्यायचा. चोरीनंतर खोट्या कागदपत्रांच्या आधारे ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर ती वाहनं विकत असे. याद्वारे अनेक निष्पाप लोकांनी त्याच्याकडून या गाड्या विकत घेतल्या असल्याचं पोलिसांना समजलं आहे.देवेश हॉटेल मॅनेजमेंटचं शिक्षण घेत होता. मात्र, त्याला जुगार खेळण्याचं व्यसन होतं. त्यातून झालेला तोटा आणि गर्लफ्रेंडवर होणारा खर्च भागवण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग स्वीकारला. पोलिसांच्या चौकशीत असंही समोर आलं की तो दर गुरुवारी आणि शनिवारी सकाळच्या वेळात, जेव्हा मार्केटमध्ये सर्वाधिक गर्दी असते, त्यावेळी होंडा पॅशन आणि होंडा स्प्लेंडर या लोकप्रिय मॉडेलच्या गाड्यांवर लक्ष ठेवत असे. कळमना पोलिसांनी गेल्या पाच महिन्यांपासून आरोपीवर गुप्त पाळत ठेवली होती. शेवटी त्याच्या हालचालींचा तपशीलवार अभ्यास करून सापळा रचला आणि त्याला जेरबंद करण्यात यश आलं. पोलिस पुढील तपास करत असून देवेशकडून आणखी काही चोरीच्या घटनांचा तपशील समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बिल्डरच्या डोक्यावर बंदूक रोखत १० फ्लॅट मागितले

**पुणे :** गुंड निलेश घायवळ आणि त्याचा भाऊ सचिन घायवळ याच्यावर गुन्हा दाखल झाल्याची मोठी बातमी समोर येत आहे. एका बांधकाम व्यवसायिकाला धमकवल्या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे काल शस्त्र परवाना दिला म्हणून निलेश घायवळचा भाऊ सचिन घायवळ हा चर्चेत आला होता.आज त्याच्यावर कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

बांधकाम व्यवसायिकाला धमकी दिल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी घायवळ एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी जबरदस्ती संबंधित घरांवर ताबा देखील घेतला होता. संबंधित फ्लॅटची किंमत ५ ते ६ कोटी असल्याची माहिती समोर येत आहे.या प्रकरणात आरोपी निलेश घायवळ, सचिन घायवळ, बापु कदम, चिक्या ऊर्फ ओंकार फाटक, मनिष माथवड, सागर चौधरी, माऊली तोंडे, निलेश शर्मा आणि इतर ५ ते ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश घायवळ याने फिर्यादी बांधकाम व्यावसायिकाला पिस्तूल डोक्याला लावून त्यांच्या इमारतीमधील एकूण १० फ्लॅटवर बेकायदेशीरपणे खंडणीच्या स्वरुपात ताबा घेतला.

## गर्लफ्रेंडच्या नातेवाईकांनी ५ वर्षांच्या चिमुकल्याला संपवलं



**पाटणा :** एका ५ वर्षांच्या मुलाची धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या करण्यात आली आहे. बिहारमधील जहानाबाद येथून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. बुधवारी (८ ऑक्टोबर) रात्री उशिरा गावातील एका घरामागील परिसरात त्याचा मृतदेह पोत्यात भरलेला आढळून आला आणि संपूर्ण गावात खळबळ माजली. मृतदेहाची स्थिती इतकी भयानक होती की त्यामुळे गावकरीच काय तर पोलीसही हादरून गेले.मिळालेल्या माहितीनुसार, तेहता पोलीस स्टेशन हद्दीतील पश्चिम सरेन गावात ही घटना घडली. चिमुकल्याच्या अशा निर्घृण हत्येने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. मृत मुलाचे नाव पाच वर्षीय आर्यन कुमार असल्याची माहिती आहे. तो सुधीर कुमार उर्फ भीम यादवचा मुलगा आहे. मुलाच्या वडिलांचे गावातील एका तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचं सांगितलं जात आहे. तरुणीच्या कुटुंबाला या प्रेमसंबंधाची माहिती मिळताच त्यांनी सूड उगवण्यासाठी चिमुकल्या आर्यनची हत्या केल्याचा संशय आहे.या प्रकरणी पोलिसांनी गावातील दोन महिलांसह तिघांना ताब्यात घेतले आहे आणि संशयावरून त्यांची चौकशी सुरू आहे. घटनेपासून त्या तरुणीचे कुटुंब फरार असल्याची माहिती आहे. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस छापे टाकत आहेत.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, आर्यन संध्याकाळी उशिरापर्यंत त्याच्या घराजवळ खेळत होता. शेजारच्या एका तरुणाने त्याचे अपहरण केल्याचा संशय आहे. शोध घेत असताना गावातील ईश्वरी यादवच्या घरामागे पोत्यात त्याचा मृतदेह आढळून आला. त्याची हत्या करुन त्याच्या मृतदेहाचे तुकडे करुन पोत्यात भरण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच, एसडीपीओ मनीष चंद्र चौधरी त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले, त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. घटनेनंतर, सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस दल तळ ठोकून आहे आणि आरोपींचा शोध घेतला जात आहे. प्रकरणामुळे गावात संताप निर्माण झाला आहे. आरोपींना त्वरित अटक करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.

## आ.नायकवडी यांच्या गाडीवर अज्ञातांकडून दगडफेक

**सांगली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधान परिषदेचे आमदार इद्रिस नायकवडी यांच्या गाडीवर दोन अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मिरज तालुक्यातील जानराववाडी ते बेळंकी रोडवर ही घटना घडली. सुदैवाने यात कोण जखमी झालं नाही. मात्र गाडीच्या मागील बाजूच्या लाईटचे किरकोळ नुकसान झाले आहे. दगडफेक करणारे दोघेजण तिथून पळून गेले. त्या ठिकाणी नागरिकांनी मोठी गर्दी केली. या परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. ते आज जानराववाडी येथून बेळंकीकडे जात असताना, दोन अज्ञात आणि मागून त्यांच्या चारचाकी गाडीवर दगडफेक केली. सुदैवाने यात कोण जखमी



झालं नाही, मात्र गाडीच्या मागील बाजूच्या लाईटचे किरकोळ नुकसान झाले आहे. दगडफेक करणारे दोघेजण तिथून पळून गेले आहेत. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.या घटनेनंतर इद्रिस नायकवडी यांनी प्रतिक्रिया दिली. 'मिरज तालुक्यातील विशेषतः पूर्व भागातील गावांचा विकासकामांचा आढावा घेण्यासाठी तसेच नागरिकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी माझा दौरा सुरु आहे. हा दौरा गेल्या महिन्याच्या ५ तारखेपासून सुरु आहे. या दरम्यान आज जानराववाडी बेळंकीकडे जात असताना संबंधित घटना घडली', अशी माहिती इद्रिस नायकवडी यांनी दिली.माझ्यासोबत माजी मंत्री अजितराव घोरपडे, पक्षाचे पदाधिकारी असे सर्वजण असल्यामुळे चार-पाच वाहनांचा ताफा होता. अजितराव घोरपडे यांच्या गाडीत मी बसलेलो होतो. माझ्या गाडीत माझे कार्यकर्ते आणि सुरक्षा रक्षक बसलेले होते. ती गाडी मागे होती. अशावेळेला आम्ही पुढे आल्यावर अज्ञातांनी आमच्या गाडीवर दगडफेक करुन पळ काढलेला आहे. पोलिसांना या घटनेची कल्पना दिली आहे. पोलीस तपास करत आहेत', अशी प्रतिक्रिया इद्रिस नायकवडी यांनी दिली.

## आमदाराला अश्लील व्हिडिओ पाठवून पैश्यांची मागणी

**ठाणे :** व्हॉट्अॅपवरुन कॉल करत एका आमदाराला अश्लील छायाचित्रे आणि व्हिडीओ पाठवले. त्यानंतर या आमदाराकडे एका महिलेने काही लाख रुपयांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या आमदाराच्या तक्रारीनंतर संबंधित महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलेचा आता पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.



तक्रारदार आमदार ठाण्यात राहत असून गेल्या वर्षी ते कोल्हापूर दौऱ्यावर होते, त्यावेळी त्यांना एका महिलेचे सातत्याने फोन येत होते. परंतु, फसवणूक होण्याच्या शक्यतेमुळे आमदाराने या महिलेचा फोन ब्लॉक केला होता. परत त्यांना एका महिलेचे व्हॉट्सअॅप कॉल आणि मेसेज येऊ लागले. या महिलेने त्यांना अश्लील फोटो आणि व्हिडीओ देखील पाठवले होते. गेल्या महिन्यात परत संबंधित महिलेने या आमदाराला संपर्क साधत, पाच ते दहा लाख रुपयांची मागणी केली. या प्रकरणी या आमदाराने आपली प्रतिमा मलीन करण्याचा हेतुपुरस्पर प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर, या महिलेच्या विरुद्ध ठाण्यातील चितळसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे, दादर येथे राहणाऱ्या ५७ वर्षीय महिलेची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. दक्षिण मुंबईतील एका प्रसिद्ध महाविद्यालयात पीडित महिला ग्रंथपाल आहे. महाविद्यालयात असताना तिला मोबाइलवर गॅस बिल भरण्याबाबत एक संदेश आला होता. तिने मेसेजमधील क्रमांकावर संपर्क केला असता, समोरील व्यक्तीने तुमचं वीज बिल भरायचं बाकी असल्याचं सांगत गॅस कनेक्शन बंद होण्याची भीती घातली. त्यावर महिलेने बिल भरण्याची तयारी दाखवताच समोरील व्यक्तीने एक अॅप डाऊनलोड करण्यास सांगितलं. अॅप डाउनलोड करताच महिलेच्या मोबाईलचा ताबा घेत समोरील व्यक्तीने घेत १७ वेळा ऑनलाईन व्यवहार करुन दोन लाख ७० हजार रुपये काढल्याचा आरोप होत आहे.

# कबड्डी खेळाचा किंग भारत!

## आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत मुला-मुलींचे दुहेरी सुवर्ण

**मनमा (बहारीन) :** बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीमध्ये आपला दबदबा सिद्ध करत दुहेरी सुवर्णपदक जिंकले. मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही कबड्डी संघांनी अंतिम सामन्यात इराणचा पराभव करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

मुलांच्या अंतिम सामन्यात भारताला इराणने जोरदार प्रतिकार केला. मात्र, एका रोमहर्षक सामन्यात भारताने ३५-३२ अशा फरकाने इराणचा पराभव करून सुवर्णपदक मिळवले. यापूर्वी, मुलांच्या संघाने बांगला देश, श्रीलंका, पाकिस्तान, इराण, बहारीन आणि थायलंडविरुद्ध विजय नोंदवत अपराजित राहण्याचा विक्रम कायम ठेवला.

मुलींच्या संघाने मात्र अंतिम सामन्यात ७५-२१ अशा मोठ्या फरकाने इराणचा धुव्वा उडवत एकतर्फी विजय मिळवला आणि सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. मुलींच्या संघानेही साखळी फेरीत बांगला देश, थायलंड, श्रीलंका आणि इराणविरुद्ध विजय मिळवत अव्वल स्थान राखले होते.

कबड्डीच्या सुवर्णपदकांनी भारताच्या एकूण पदकतालिकेला मोठी चालना दिली. तायक्वाँदोमध्ये देबासीश दास (मुलांची वैयक्तिक पुमसे) आणि यशविनी सिंग व शिवांशू पटेल (मिश्र जोडी पुमसे) यांनी उपांत्य फेरीत पराभूत झाल्यानंतर कांस्यपदके जिंकली. या स्पर्धेत भारताच्या एकूण पदकांची संख्या १० वर पोहोचली आहे, ज्यात २ सुवर्ण, ३ रौप्य आणि ५ कांस्यपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत २२२ सदस्यीय भारतीय पथक सहभागी झाले आहे. स्पर्धेचा समारोप ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे.



## विराट-रोहितचा ऑस्ट्रेलियातील शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना?

**येओसू (कोरिया) :** सिडनी : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना आज शनिवारी सिडनीत होणार आहे. या मालिकेतील पहिले दोन सामने टीम इंडियाने गमावले आहेत. यामध्ये विराट कोहली, रोहित शर्मा प्रभाव टाकू शकले नाहीत. आजचा हा सामना या दोघांसाठी शेवटचा एकदिवसीय सामना असू शकतो. तसेच, या दोघांचा शेवटचा ऑस्ट्रेलिया दौराही असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विराट आणि रोहित यांनी याअधीच कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून याआधीच निवृत्ती स्वीकारली आहे. टीम इंडिया पुढील दोन वर्षांत ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार नाही. त्यामुळे विराट आणि रोहितचा आजचा सामना आणि हा दौरा कांगारूंच्या देशातील अर्थात ऑस्ट्रेलियाचा शेवटचा दौरा ठरण्याची



शक्यता आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाविरुद्ध शनिवारी होणाऱ्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडियासाठी 'करो वा मरो'सारखी स्थिती आहे. पहिले दोन सामने गमावल्यानंतर आता किमान तिसरा सामना जिंकून 'क्लीन स्विप' टाळ्याचे आव्हान टीम इंडियासमोर असणार आहे. विशेष म्हणजे, एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध कधीही 'क्लीन स्विप' केलेली नाही. हा ऐतिहासिक पराभव टाळण्यासाठी कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला 'करो वा मरो'ची कामगिरी करावी लागेल.

## पाकची ज्यु.हॉकी विश्वचषकातून माघार

### भारतात खेळण्यास नकार

**चेन्नई : :** भारत आणि पाकिस्तानमधील बिघडलेल्या क्रीडा संबंधांमुळे पाकिस्तानने येत्या नोव्हेंबर-डिसेंबर (२०२५) मध्ये भारतात होर्णाया पुरुष ज्युनिअर हॉकी विश्वचषक स्पर्धेतून माघार घेतली आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) शुक्रवारी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

अलीकडील दहशतवादी हल्ले आणि त्यानंतर भारत-पाकिस्तानमधील बिघडलेले संबंध. भारताचे नवीन धोरण ज्यामुळे द्विपक्षीय (बायलॅटरल) क्रीडा स्पर्धांवर निर्बंध आले आहेत. या पार्श्वभूमीवर पाकिस्तान हॉकी महासंघाने (पीएचएफ) खेळाडूंच्या सुरक्षेचे कारण देत माघार घेतली आहे. पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानने भारतीय स्पर्धेतून माघार घेण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बिहारमधील राजगीर येथे झालेल्या पुरुषांच्या आशिया कप हॉकी स्पर्धेतूनही पाकिस्तानने माघार घेतली होती.

मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा चुकवू नये, यासाठी पाकिस्तान हॉकी महासंघ (पीएचएफ) आता स्पर्धेसाठी तटस्थ ठिकाण (न्यूट्रल वेन्यू) मिळावे, यासाठी आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाकडे (एफएचआय) मागणी करत आहे.

ज्युनिअर हॉकी विश्वचषक स्पर्धा २८ नोव्हेंबर ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत चेन्नई आणि मदुराई येथे होणार आहे. स्पर्धेत पाकिस्तानला भारत, चिली आणि




स्वीत्झर्लंडसह 'ब' गटात आहेत. या स्पर्धेतून पाकिस्तान माघार घेतल्यामुळे आता त्यांच्या जागी कोणत्या संघाचा समावेश करण्यात येणार याबाबतची घोषणा लवकरच केली जाईल. भारताने पाकिस्तानसोबत द्विपक्षीय सामने न खेळण्याचे धोरण ठेवले असले, तरी बहुराष्ट्रीय (बायलॅटरलत) स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आहे, असे असूनही पाकिस्तानने माघार घेतल्याने दोन्ही देशांतील क्रीडा संबंध अधिक तणावाचे बनले आहेत.

## शौर्या अंबुरेला १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक

**रिफा (बहारीन) :** भारताची १६ वर्षीय धावपटू शौर्था अंबुरे (महाराष्ट्र) हिने येथे सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकून आपला २०२५ चा उत्कृष्ट फॉर्म कायम राखला आहे. अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंद अशी वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत मोठी कामगिरी केली. दरम्यान, शुक्रवारी भारताने या स्पर्धेत ट्रॅक आणि फिल्डमध्ये तीन पदके जिंकली. यामध्ये शौर्य अंबुरेसह पलाश मंडल आणि जस्मिन कौर यांचा समावेश आहे.

शौर्यासाठी हे रौप्यपदक खूप महत्त्वाचे ठरले. कारण, यंदाच्या हंगामातील हे तिचे तिसरे मोठे आंतरराष्ट्रीय पदक आहे. यापूर्वी तिने भुवनेश्वर येथील राष्ट्रीय ज्युनियर अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. आशियाई १८ वयोगटाच्या चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक मिळवले होते. आशियाई स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तिची हीटमधील वेळ १४.०० सेकंद होती. परंतु, अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंदांपर्यंत सुधारणा केली, जी तिचा दबावाखाली सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आत्मविश्वास दाखविते.

भारताच्या पलाश मंडलने ५००० मीटर चालण्याच्या शर्यतीत २४ मिनिटे ४८.९२ सेकंद (२४:४८.९२) वेळेची नोंद करत कांस्यपदक मिळविले. चीनच्या खेळाडूंनी या शर्यतीत वर्चस्व राखले. हाओझे झांगने २१:४३.८२ सेकंद वेळेसह सुवर्णपदक जिंकले, तर यूजी लू याने २२:२८.६४ सेकंद वेळेसह रौप्यपदक पटकावले. दरम्यान, भारताच्या जस्मिन कौरने महिलांच्या गोळाफेक प्रकारात कांस्यपदक संपादन केले. तिने १४.८६ मीटर गोळाफेक केली. तिची सहकारी जॉय बैदवान १४.५३ मीटरसह सहाव्या स्थानावर राहिली.

महिला ४०० मीटर हीट: एडविना जेसन (५५.७१ सेकंद) आणि तन्नू (५७.५४ सेकंद) या दोघींनी उपांत्य फेरीसाठी पात्रता मिळवली. पुरुष ४०० मीटर हीट : रामू लोंडगे याने ४९.६२ सेकंदाची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. पुरुष १०० मीटर हीट : दिव्यांश राज (११.०१ सेकंद) आणि निखिल कमल (११.१६ सेकंद) यांनी पुढील फेरी गाठली. मात्र, उपांत्य फेरीत ते बाहेर पडले.




# रेड चिलीज, Netflix ला हायकोर्टाची नोटीस

**मुंबई :** शाहरुख खानच्या रेड चीलीज एंटरटेनमेंट निर्मित आणि नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'Bads of Bollywood' या डॉक्युमेंटरी सिरीजवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या मालिकेत स्वतःची प्रतिमा चुकीच्या पद्धतीने दाखविल्याचा आरोप करत माजी एनसीबी अधिकारी समीर वानखेडे यांनी दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. ही याचिका स्वीकारत दिल्ली हायकोर्टाने रेड चीलीज आणि नेटफ्लिक्सला नोटीस बजावली आहे. न्यायालयाने सर्व पक्षकारांना येत्या ७ दिवसांत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

'Bads of Bollywood' या सिरीजमध्ये बॉलिवूडमधील काही वादग्रस्त प्रकरणांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यात आर्यन खान ड्रग्ज केसचाही उल्लेख आहे, ज्यात समीर वानखेडे हे तपास अधिकारी होते. याच प्रकरणामुळे शाहरुख खानच्या रेड चीलीज कंपनीचा या सिरीजशी संबंध असल्याने आता प्रकरण अधिकच गाजत आहे.

नेटफ्लिक्स आणि रेड चीलीजला नोटीस जारी करण्यात आली असून येत्या ७ दिवसांत सर्व पक्षकारांनी उत्तर द्यावं, असे दिल्ली हायकोर्टाने आदेश दिले आहेत. समीर वानखेडे यांनी शोचे निर्माता




यांच्यावर मानहानीचा दावा केला होता. आपली प्रतिमा चुकीच्या पद्धतीनं दाखविली गेली. यामुळे तपास यंत्रणेच्या मनोबलावर परिणाम होईल, असे म्हटले होते. वानखेडे यांनी आपल्या याचिकेत म्हटलं आहे की, या मालिकेत त्यांच्या भूमिकेचे चुकीचे चित्रण करण्यात आले असून त्यातून जनतेमध्ये त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न झाला आहे. दरम्यान, वानखेडे यांच्या याचिकेवर पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार आहे. कोर्टाने म्हटलं आहे की, ङ्गसर्व पक्षांनी आपले उत्तर लेखी स्वरूपात ७ दिवसांत सादर करावे, त्यानंतर पुढील आदेश देण्यात येतील.

### काय आहे प्रकरण ?

समीर वानखेडे यांनी ड्रग्ज प्रकरणात आर्यन खानला क्रुझवरून ताब्यात घेतले होते. त्यानंतर आर्यनने बॅड्स ऑफ बॉलिवूड या सीरीजमधून दिग्दर्शनात पाऊल ठेवले. या सीरीजमध्ये समीर वानखेडेंशी संबंधित काही दृश्ये आहेत, ज्यामुळे सोशल मीडियावर खूप चर्चा झाली. त्यातील काही सीन्स सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले, ज्यामुळे समीर वानखेडे यांनी संताप व्यक्त केला. यानंतर समीर वानखेडे यांनी नेटफ्लिक्सच्या 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबसीरीज विरोधात दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. त्यांनी नेटफ्लिक्स आणि शाहरुख खानची कंपनी रेड चिलीज एंटरटेनमेंटच्या विरोधात २ कोटींची मानहानीची याचिका दाखल करून नुकसान भरपाई मागितली होती. पण, कोर्टाने आर्यन खानची सीरीज 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' विरुद्ध दाखल केलेल्या २ कोटी रुपयांच्या मानहानीच्या खटल्यात त्यांना तात्काळ अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला होता.

# हर्षवर्धन राणे-सोनमच्या वेड्या प्रेमाचा अंत?




मुंबई - बॉलिवूडमध्ये पुन्हा एकदा रोमान्स आणि थरारक कथेने परिपूर्ण चित्रपट येतोय. 'एक दीवाने की दीवानियत' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला असून त्यात हर्षवर्धन राणे आणि सोनम बाजवा यांची इमोशनल केमिस्ट्री पाहायला मिळते. ट्रेलर रिलीज होताच सोशल मीडियावर जबरदस्त क्रेझ निर्माण केली आहे.

चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात एका रहस्यमय आणि गूढ प्रेमकथेनं होते. प्रेम, वेडेपणा, आसक्ती आणि सूड यांची गुंफण असलेली ही कथा पाहणाऱ्याला थक्क करते. हर्षवर्धन राणे एका वेड्या प्रेमात अडकलेला, तीव्र भावनांनी भारलेला प्रियकर साकारत आहे. सनम तेरी कसम फेम अभिनेता हर्षवर्धन राणे आपला आगामी चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'मुळे चर्चेत आहे. तो पुन्हा एकदा लव्ह स्टोरीमधून प्रेक्षकांसमोर येतोय, ज्यामध्ये प्रेम आणि द्वेष दोन्ही दिसेल. त्यांचा चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'चा ट्रेलर रिलीज झाला आहे. चित्रपटाने ट्रेलरमध्ये अशी प्रेम कहाणी दाखवलीय, जे पाहून फॅन्स उत्सुक आहेत.

हर्षवर्धन राणेने आपल्या सोशल मीडिया हँडलवर चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. कॅप्शन देखील लिहिलीय - 'इतिहास का मैं पहला रावण हूं जो खुद सीता को घर छोड़ कर आएगा. #EkDeewaneKiDEEWANIYAT ट्रेलर अभी जारी...'

या दिवाळीत चित्रपटगृहामध्ये २१ ऑक्टोबर, २०२५ रोजी ट्रेलरच्या आधी चित्रपटाचा टीझरआणि गाणी खूप पसंतीस उतरले आहे. टायटल ट्रॅकसह एकूण ३ गाणे आतापर्यंत रिलीज झाले आहेत. तिन्हीही गाणी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली असून चित्रपटाची क्रेझ आहे.

हर्षवर्धन राणे यापूर्वी सनम तेरी कसम, तारा वर्सेस बिलाल यांसारख्या चित्रपटांतून चर्चेत आला होतो. तर सोनम बाजवा ही पंजाबी आणि हिंदी सिनेसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. या दोघांची ऑन-स्क्रीन जोडी प्रेक्षकांना खूपच आवडली आहे. मिलाप जावेरी दिग्दर्शित या चित्रपटाचा सामना थामाशी होणार आहे. तामा चित्रपटात आयुष्मान खुराना -रश्मिका मंदाना यांच्याशी होईल. 'थामा' मॅडॉक हॉरर-कॉमेडी युनिवर्सचा भाग आहे.



# आधी ६० कोटी रुपये जमा करा, नंतर परदेशात जा



**मुंबई :** शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांना मुंबई उच्च न्यायालायाने सुनावले. आधी ६० कोटी जमा करा, नंतर परदेशात जा, असे निर्देश कोर्टाने या कपलला दिले आहेत. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या ६० कोटी रूपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ही फसवणूक त्यांच्या बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत गुंतवणूक डील संदर्भातील आहे. या प्रकरणी पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने जवळपास साडे चार तास शिल्पा शेट्टीची चौकशी केली. या प्रकरणामध्ये शिल्पाचे पती राज कुंद्रासह पाच लोकांचे जबाब नोंदवण्यात आला आहे. या कपलने कोर्टाकडे परदेशात जाण्यासाठी परवानगी मागितली होती. पण कोर्टाने ती नाकारली.

# दीपिकाने हिजाब घातल्याने सोशल मीडियावर ट्रोल..

**मुंबई :** बॉलिवूडमधील सर्वात प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक असलेले दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग हे सध्या चर्चेत आहेत. यावेळी, कारण मुस्लिमांच्या वेशात घालण्यात आलेला त्यांचा एक नवीन व्हिडिओ आहे. दीपिकाने हिजाब घातला आहे, तर रणवीर मोठी दाढी घातलेला दिसत आहे. हा चित्रपटातील दृश्य नाही; प्रत्यक्षात या जोडप्याने असा पोशाख घातला आहे. दोघांचा हा व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे, अनेक लोक त्याचे कौतुक करत आहेत आणि काहीजण त्यांना ट्रोल करत आहेत.

दीपिका आणि रणवीरने त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला आहे, त्याला कॅप्शन दिले आहे, 'मेरा सुकून' हा व्हिडिओ ऑनलाइन व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये ते अबुधाबीच्या सुंदर ठिकाणांचे कौतुक करताना दिसत आहेत. हे जोडपे अबुधाबी पर्यटनाचा प्रचार करत आहे आणि हा व्हिडिओ त्या प्रयत्नांचा एक भाग आहे.

लोक आता त्यांच्या लूकवर कमेंट करत



आहेत. एका वापरकर्त्याने कमेंट सेक्शनमध्ये रणवीरच्या नेहमीच्या विचित्र फॅशनची खिल्ली उडवत लिहिले आहे की, 'कोणीतरी त्याला संग्रहालयात पाठवा, रणवीर नेहमीच विचित्र दिसतो.' दुसऱ्याने लिहिले, 'तो हिंदू असूनही हिजाब का घालतो?' तिसऱ्याने लिहिले, 'तुम्ही भारतीय संस्कृतीऐवजी इतर संस्कृतींचा प्रचार करत आहात का? दीपिका आणि रणवीरने हे करायला नको होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५
# अध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यांसाठी ३३ नामनिर्देश पत्र दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रमानुसार दि. १० नोव्हेंबर २०२५ पासून नामनिर्देशपत्र दाखल करणे सुरु झाले असून आतापर्यंत नगरपरिषद अध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यांसाठी ३३ नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. नामनिर्देशन अर्ज याप्रमाणे : बुलढाणा येथे नगरपरिषद सदस्यासाठी ३, चिखली येथे अध्यक्षासाठी १ व सदस्यासाठी ८, लोणार येथे अध्यक्षासाठी १, मलकापूर येथे




सदस्यासाठी ६, मेहकर येथे अध्यक्षसाठी २ व सदस्यासाठी ८, नांदुरा येथे अध्यक्ष व सदस्यासाठी प्रत्येक १, शेगांव येथे सदस्यासाठी ६, सिंदखेड राजा येथे सदस्यासाठी १ असे एकूण नगरपरिषद अध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यासाठी ३३ नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे पूर्वप्रमाणन आवश्यक
## राज्य निवडणूक आयोगाचे आदेश जारी
## जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती गठीत

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या माध्यमातून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासन राजपत्राद्वारे आदेश जारी केले आहे. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत उपविभगीय अधिकारी, बुलढाणा, अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा, मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे जिल्हा प्रतिनिधी हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. दि. ९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, बल्क एसएमएस, व्हाईस एसएमएस), संकेतस्थळे आदींचा समावेश होतो. मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहीरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु अशा माध्यमातून जाहिराती प्रसिद्ध करतांना आचारसंहिता किंवा संबंधित कायद्याचे उल्लंघन होता कामा नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार विशिष्ट स्वरूपाच्या आशयाचा समावेश असलेल्या जाहिराती प्रसारित / प्रसिद्ध करता येणार नाहीत व अशा स्वरुपाच्या जाहिरातीचे पूर्वप्रमाणनही केले जाणार नाही. त्यानुसार (क) भारतीय संविधानाची पायमल्ली, केंद्र/राज्य शासनाच्या कायद्याचे उल्लंघन, (ख) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांची पायमल्ली, (ग) धर्म, वंश, जात, लिंग, भाषा, पेहराव इत्यादीच्या आधारे तेढ अथवा शत्रुत्वाची शक्यता, (घ) प्रार्थना स्थळांचे छायाचित्र / छायाचित्रणाचा समावेश, (ङ) कायदा व सुव्यवस्थेला आव्हान, हिंसेला प्रोत्साहन, शांततेचा भंग, (च) न्यायालयाचा अथवा एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची बदनामी, (छ) देशाच्या ऐक्याला, सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा, (ज) अन्य कुठल्याही देशावर टिका, अवमानजनक टिप्पणी अथवा तिरस्कारपूर्ण विधान, (झ) संरक्षण दलाच्या अधिकारी / कर्मचारी अथवा संरक्षण दलाचे छायाचित्र/




छायाचित्रण, (ञ) राजकीय पक्ष, राजकीय नेता किंवा अन्य कोणावरही खोटे आरोप, (ट) कुठल्याही राजकीय नेत्याच्या अथवा व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात हस्तक्षेप,(ठ) नीतिमत्ता व सभ्यतेचे उल्लंघन,(ड) अश्लिलतेला प्रोत्साहन अशा स्वरुपाच्या जाहिराती प्रसारित / प्रसिद्ध करता येणार नाहीत व पूर्वप्रमाणन केले जाणार नाही. प्रस्तावित जाहिरात प्रसारित/प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल. प्रस्तावित जाहिरात संपूर्ण राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी असल्यास किंवा १० पेक्षा अधिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणनाच्या अर्जासमवेत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती जोडणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# परवानाधारकाकडील शस्त्रे पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्याचे जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे निर्देश

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील परवानाधारकाकडे असलेले शस्त्रे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना छाननी समितीने जाहिर केले आहे. त्याअनुषंगाने मार्गदर्शक सूचनाचे पालन करुन परवानाधारक व्यक्तींनी आपली शस्त्रे त्वरीत पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्याचे निर्देश जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमीत केले आहेत. छाननी समितीने जाहिर केलेले मार्गदर्शक सूचना : बँक, संस्था,सोनार,देवस्थान आणि पेट्रोलपंप धारक यांचेकडे असलेले शस्त्रपरवाने निवडणूक कालावधीत जमा करण्याची आवश्यकता नसल्याचे समितीने निर्णय घेतला आहे. नगरपालीका/नगरपरीषद क्षेत्रातील शस्त्रपरवानाधारक यांचेकडून शस्त्रे जमा करावी. याव्यतिरिक्त निवडणूकीच्या कालावधीमध्ये शस्त्र जमा करण्यापासून सुट देण्याबाबत शस्त्र परवानाधारक यांचेकडून विनंती अर्ज प्राप्त झाल्यास पोलीस विभागाने शस्त्र परवानाधारक यांना सूट देण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ? याबाबत सखोल पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज निर्णयार्थ छाननी समिती समोर सादर केल्या जाईल. जे शस्त्र परवानाधारक गंभीर स्वरुपाचे गुन्ह्यात(भारतीय दंड संहिता मधील सर्व प्रकारचे गुन्हे) इत्यादी गुन्ह्यात अडकलेले आहेत व त्यांना जामीनावर सुटका मिळालेली आहे अशा परवाना धारकांकडून कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही यासाठी त्यांच्याकडील शस्त्र तात्काळ जमा करावी. ज्या शस्त्र परवाना धारकांना अपराधाची पार्श्वभूमी आहे. तसेच कोणत्याही निवडणूकी दरम्यान घडलेल्या दंगलीमध्ये कायदा व सुव्यवस्था भंग करण्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या शस्त्र परवानाधारकाचे देखील शस्त्रे पोलीस विभागाकडून जमा करण्यात यावे.

# बुलढाणा ते वझर आघाव बसफेरी बंद
## शेतकऱ्यांचा संताप! आंदोलनाचा इशारा!




**जनसंचलन/बुलढाणा**

मागील काही महिन्यांपासून बंद असलेली बुलढाणा ते वझर आघाव मुक्कामी बस फेरी तात्काळ सुरू करण्याची मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी केली असून, तातडीने निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. सहदेव लाड यांनी विभागीय नियंत्रक बुलढाणा यांच्याकडे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ही बसफेरी गेल्या २५ वर्षांपासून नियमित सुरु होती. बुलढाणाकिनगाव जट्टूभुमराळावझर आघाव हा मार्ग शाळकरी विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरला होता. मात्र काही महिन्यांपासून बस बंद असल्याने प्रवाशांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, तर



शेतकऱ्यांना बाजारपेठ व कामानिमित्त जिल्हा ठिकाणी पोहोचण्यासाठी खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे, ज्यामुळे वेळ आणि पैशाचा मोठा अपव्यय होत आहे. शासनाने तत्काळ बससेवा पुन्हा सुरू न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन उभारू, असा इशारा सहदेव लाड यांनी दिला आहे. या निवेदनावर अनिल लांडगे यांची हीस्वाक्षरी आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेची लिंक ठप्प; शेतकरी त्रस्त

## शासकीय अनुदानही वेळेवर मिळत नसल्याने समस्या

जनसंचलन/ अंढेरा

येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेची लिंक मागील तीन दिवसांपासून ठप्प असल्याने शाखेचे सर्व व्यवहार पूर्णपणे बंद झाले आहेत. त्यामुळे शेतकरी, महिला, वयोवृद्ध, निराधार आणि लांबवरून येणारे ग्राहक हक्काच्या पैशांसाठी दिवसभर रांगेत बसून आहेत. विलीनीकरणानंतरही बँकेकडून मूलभूत सेवा सुरळीत न मिळाल्याने ग्राहकांमध्ये नाराजी पसरली आहे. सहा विदर्भ कोकण ग्रामीण बँकेचे १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत विलीनीकरण झाले; मात्र महिन्यांनंतरही यूपीआय, एनईएफटी, आरटीजीएस, सेम डे चेक क्लिअरन्स यासारख्या मूलभूत सेवा ग्राहकांना उपलब्ध झालेल्या नाहीत. जुन्याच पासबुकवर नवीन खाते क्रमांक लिहून देण्यापलीकडे कोणतीही सुविधा पुरवली जात नसल्याने लोकांत संभ्रम निर्माण झाला आहे. लिंक फेलमुळे शेतकऱ्यांच्या महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा



अंढेरा येथे लिंक फेल असल्याने झालेली ग्राहकांची गर्दी.

आर्थिक व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. रब्बी हंगाम जवळ येत असताना शासनाने दिलेले दुष्काळी मदत वेळेवर मिळत नसल्याने पेरणी उशिरा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शिवाय शाखेत वेळोवेळी रोख रकमेचा तुटवडा भासत असल्याने ग्राहकांचे हाल अधिकच वाढले आहेत. अंढेरा, सेवानगर, पिंपरी आंधळे, मेंडगाव, बायगाव, शिवणी आरमाळ, सावखेड नागरे आदी गावांतील ग्रामस्थ दिवसांपासून शेतकरी, नागरिक झाले आहेत अस्त मोठ्या प्रमाणावर या शाखेवर अवलंबून आहेत; परंतु, लिंक नसल्यामुळे दिवसभर शाखेत बसून राहण्याची वेळ त्यांच्यावर येत असून, आपलेच पैसे मिळवण्यासाठी इतकी प्रतीक्षा का करावी लागत आहे असा प्रश्न ठेवीदार उपस्थित करत आहेत. लिंक फेलची समस्या पातळीवर कळवली असून, व्यवहार लवकरच सुरळीत होतील, असे शाखा व्यवस्थापक गणेश छबिले यांनी सांगितले

# खामगाव नगर परिषदेच्या करवाढीचा पुनर्विचार करावा!

जनसंचलन/ खामगाव

येथील नगर परिषदेमार्फत सन २०२५-२६ साठी प्रस्तावित वार्षिक कर मूल्यमापनात मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात आली आहे. या वाढीचा तातडीने पुनर्विचार करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी केली आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात चौकसे यांनी म्हटले आहे की, खामगाव ही नगरपालिका असूनही करवाढ ही महानगरपालिकेलाही लाजवेल इतकी प्रचंड करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शहरात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नियमित नाही, रस्ते, नाल्या, दिवाबत्ती, साफसफाई यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असूनही, वार्षिक कर १,२०० रुपयांवरून थेट १,८०० रुपये इतका करण्यात आला आहे. नियमांनुसार, नगर परिषदेला पाच वर्षांत जास्तीत जास्त २० टक्के करवाढीचा अधिकार असताना, तब्बल ३०० टक्क्यांची वाढ हुकूमशाही पद्धतीने केल्याचा आरोप चौकसे यांनी केला. शेजारच्या शेगाव शहरात अशा प्रकारची कोणतीही करवाढ करण्यात आलेली नसल्याचेही त्यांनी नमूद केले. नागरिकांवर अन्यायकारक भार पडत असल्याने या करवाढीचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद विद्यालयातून २२ हजारांचे साहित्य गायब

जनसंचलन/बुलढाणा

शहरातील जिल्हा परिषद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेचे कुलूप तोडून चोरट्यांनी महत्त्वाचे शैक्षणिक साहित्य पळविल्याची घटना ७ नोव्हेंबर रोजी उघड झाली. या चोरीत २२ हजार ५०० रुपयांचे साहित्य लंपास झाले असून, आणखी २० हजारांचे नुकसान तोडफोडीत झाले आहे. जिल्हा परिषद व जिल्हा या न्यायालयालगत असलेल्या शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र भौतिक शास्त्र प्रयोगशाळा आहे. ६ नोव्हेंबरच्या सायंकाळी प्राचार्य विष्णू तायडे व कर्मचारी नियमितप्रमाणे शाळा बंद करून घरी गेले. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी शिक्षक चारूदत्त नेरकर यांनी प्रयोगशाळा उघडण्याचा प्रयत्न केला असता कुलूप तुटलेले दिसले. या प्रकरणी प्राचार्य तायडे यांनी बुलढाणा शहर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

# बुलढाण्यात फोरडी रडार इंटरसेप्टरची एंट्री, कारवाईचा वेग वाढणार!

## अतिवेग, मद्यपान व ब्लॅक फिल्म वाहनांवर आता थेट कारवाई

जनसंचलन/बुलढाणा



जिल्ह्यात वाढत्या वेगमर्यादा उल्लंघनाच्या घटनांवर लगाम लावण्यासाठी बुलढाणा पोलिस दलाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ताकद मिळाली आहे. महाराष्ट्र पोलिस महासंचालक कार्यालयाकडून मंजूर झालेली फोरडी रडार तंत्रज्ञानयुक्त तीन इंटरसेप्टर वाहने आता जिल्ह्याच्या ताफ्यात दाखल झाली असून, रस्ते अपघात रोखण्यासाठी ती महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. गुरुवारी पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्या हस्ते ही वाहने जिल्हा वाहतूक शाखा आणि महामार्ग पोलिस केंद्र, मलकापूर यांना वितरित करण्यात आली. या वेळी अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड उपस्थित होते. पोलिस अधीक्षकांनी संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईच्या कार्यपद्धतीबाबत विशेष मार्गदर्शनही केले. या नव्या इंटरसेप्टर वाहनांमध्ये वेग ओळखण्यासाठी अत्याधुनिक फोरडी रडार, तसेच ब्रेथ ॲनालायझर आणि टिंट मीटर बसविण्यात आले आहेत

# देऊळगाव राजात प्रस्थापित नेते संभाव्य बंडखोरी रोखू शकतील का?

जनसंचलन/ देऊळगाव राजा

पालिका निवडणुका जाहीर होताच देऊळगाव राजामध्ये राजकीय हालचालींना अचानक वेग आला आहे. कधीही न दिसणारे अनेक चेहरे नगराध्यक्ष किंवा नगरसेवक पदासाठी स्वतःला सक्षम म्हणून सोशल मीडियावर सध्या प्रकट झाले आहेत. या नव्या चेहऱ्यांच्या अचानक येण्यामुळे शहरवासीयांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. यातून प्रसंगी बंडखोरी होण्याची शक्यता पाहता प्रस्थापित राजकारणी बंडखोरी रोखू शकतील का, असा प्रश्न असतानाच उमेदवारीचा पेचही येथे तीव्र होत आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार मनोज कायंदे आणि त्यांच्या पक्षाने केलेल्या राजकीय उलथापालथीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही त्यांचा प्रभाव वाढेल का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या शक्यतेमुळे विरोधी गटातील प्रस्थापित नेत्यांची धावपळ वाढली असून, काही कार्यकर्ते उमेदवारीच्या लालसेने एका रात्रीत पक्षबदल करत आहेत. परिणामी पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. उमेदवार निवडताना नव्याने पक्षात दाखल झालेल्यांना प्राधान्य दिले जाणार की जुन्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांना, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. विशेष म्हणजे, सोशल मीडियावर आम्ही सक्षम अशा पोस्टचा पूर आलेला असला तरी विकासाचा ठोस व्हिजन मात्र अद्याप गायब आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८